# ७. स्वदेशी विचार आणि शिक्षण

'स्वदेशी' हा शब्द आता सर्वांनाच परिचित झाला आहे. सध्या जिकडे तिकडे 'स्वदेशी' ह्या विषयावर चर्चा सुरू आहे पण ही चर्चा 'स्वदेशी' ह्या शब्दाचा अर्थ व आशय समजून किती लोक करतात? ही संकल्पना काय आहे? भारतीय ही संकल्पना अमलात आणू शकतील काय? स्वदेशी विचारधारेमुळे देशांना फायदा होईल का तोटा? असे अनेक प्रश्न तज्ज्ञ मंडळी करताना आपल्याला आढळतात. बरेचजण स्वदेशीचा आशय समजून न घेता त्यावर टीकाही करतात. आजचे युग हे पाश्चात्यीकरणाचे, विज्ञानाचे, तंत्रज्ञानाचे, भोगवादाचे, चंगळवादाचे युग आहे. पाश्चात्त्य विचारधारेमुळे भौतिक समृद्धी झाली असे जरी वाटत असले, तरीही हा समृद्धीचा डोलारा पोकळ आहे. कारण ह्या विचारधारेमुळे संपूर्ण सृष्टीचेच अस्तित्त्व आज धोक्यात आले आहे. संपूर्ण मानवजातींचा समतोल, सुख, शांतता आज नाश पावत आहे. हा मार्ग मानवजातीला सुख व शांती प्रदान करणारा नाही हे सिद्ध झाले आहे. पण ह्यावर जर तोडगा काढायचा असेल तर सर्वप्रथम 'स्वदेशी' विचारधारा स्वीकारावी लागेल.

आज भारतीय अर्थव्यवस्था गंभीर, गहन संकटांच्या भोवऱ्यात सापडली आहे. १९४७ साली जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा सर्वांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. "आता आपण विकासाच्या मार्गावर वाटचाल करू." "आता आपण स्वयंपूर्ण बनू." "आता आपण खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य उपभोगू." "आता आपण स्वाभिमानी बनू." एवढेच नव्हे तर आता आपण जगात सुखी, सुदृढ, संपन्न, स्वावलंबी राष्ट्र म्हणून उभे राहू. पण आज ही स्वप्ने स्वप्नेच राहिली, कारण आज भारत जरी स्वावलंबी, विकसित वाटत असला, तरी आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासाचा पाया स्वदेशी कंपन्या यापेक्षा विदेशी कंपन्यांचा व्यवहार आहे. नैतिक, आध्यात्मिक सर्व बाजूने भारताची अधोगती सुरू आहे. नव्हे याचे कारणही विदेशी भांडवलाचे अवलंबन ही भारताची दिवाळखोरीच आहे. ह्या दिवाळखोरीतून वाचायचे असेल, तर भारताला विकासाच्या योग्य मार्गाची निवड करावीच लागेल. आंतरराष्ट्रीय संस्था, विदेशी भांडवलदार, तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांवर आपण किती काळ अवलंबून आपले राष्ट्र स्वावलंबी व वैभवशाली बनवू शकू? पण आज भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्तोम माजले आहे. भारताने Infrastructural Adjustment ह्या संकल्पनेखाली विदेशी कंपन्यांची दारे उघडून दिली आहेत. आधीच्या प्रतिबंधित उद्योगामध्ये ५१% विदेशी गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली आहे. कोकाकोला, पेप्सीसारख्या विदेशी कंपन्यांना विदेशी भांडवलाच्या शाखा स्थापन करण्याची अनुमती देण्यात आली आहे. ह्यात कहर म्हणजे ह्या सर्व बाबींना मंजुरी देता यावी म्हणून 'विदेशी निवेश संवर्धन बोर्ड' स्थापन


करण्यात आले आहे. भारतात स्थायिक झालेल्या काही कंपन्यांनी खाद्यपदार्थ, साबण, सौंदर्यप्रसाधन इत्यादी क्षेत्रात आपला एकाधिकार स्थापन केला आहे. परिणामी भारतीय कंपन्यांचे व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. 'आशियन टायगर्स' म्हणविणारे कांही देश, ज्यांचा संपूर्ण विकासाचा मार्ग हा वैश्विकरणाचा होता. आपल्या चलनाचे प्रचंड अवमूल्यन त्यांना करावे लागत आहे. UNCTAD चे म्हणणे आहे, की सुदैवाने भारताने स्वतःला आर्थिक वैश्विकरणापासून वेगळे ठेवले नाही, तर 'आशियन टायगर्स'सारखी भारताची अवस्था होईल. तात्पर्य, पाश्चात्य विकास विचारधारेचा स्वीकार केल्यास भारताला आपला विकास साधता येणार नाहीच पण भारत पुन्हा विदेशी घशात गेल्याशिवाय राहणार नाही. विदेशी धोरण आत्मघातकी आहे. देशाची दिशाभूल करणारे आहे. भ्रामक आहे. ह्यातून आता बाहेर पडावेच लागेल. आज आवश्यकता आहे, 'स्वदेशी पथ' निर्माण करण्याची. आपल्यावर जी धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक आक्रमणे होत आहेत, ती थोपविण्याची. आपली संशोधने, आपली प्रतिभा, आपली आवश्यकता आणि आपल्या स्वभावाला अनुरूप आपण आपला विकास करू. ही स्वदेशी संकल्पना समाजात भावी पिढीत रुजवावी लागेल. 'स्वदेशी' हा केवळ विचार नाही तर ती जीवनप्रणाली आहे, हे आता भारताला समजायला हवे. अजूनही वेळ गेलेली नाही. आजची पिढी हुशार आहे, आक्रमक आहे, कर्तृत्ववान आहे. स्वतंत्र विचारसरणीची आहे. ह्या व्यक्तिमत्त्वाला योग्य पैलू पाडायला हवे. त्यांच्या सृजनशीलतेला विधायक कार्याची जोड द्यावयास हवी व ही दिशा देण्याचे कार्य किंवा साधन शिक्षण आहे. आता शिक्षणव्यवस्थेला बदलावेच लागेल कारण शिक्षण म्हणजे सुसंस्कार, शिक्षण म्हणजे वर्तनबदल, शिक्षण म्हणजे संस्कृती संवर्धन, शिक्षण म्हणजे संस्कृती संक्रमण, शिक्षणाच्या माध्यमातून स्वदेशी विचारधारा रुजवावी लागेल व व्यक्तिकरिताच प्राथमिक शिक्षणापासून शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन करावे लागेल. शिक्षणाला आपली स्वनीती निर्धारित करावी लागेल. 'स्वदेशी शिक्षण व्यवस्था', 'स्वदेशी शिक्षण संस्था' आणि मुख्य म्हणजे 'स्वदेशी मनोवृत्तीचे शिक्षक' ह्या सर्व बाबी घडवाव्या लागतील. ही बाब कठीण असली तरी अशक्य नाही. प्रयत्नसाध्य आहे. १९४९ साली 'प्रभाकर' ह्या वृत्तपत्रात श्री.गोपाळराव देशमुख यांनी एक विधान केले होते, की ''भारतीय जनतेने आयात मालाच्या जागी भारतीय उत्पादनांचा वापर करावा.'' त्यापलीकडे जाऊन मी असे धाडसी विधान करते, की ''भारतीय जनतेने आयात केलेली विचारसरणी, संस्कृती, परंपरा, आचारपद्धती, सामाजिक संकेत या जागी भारतीय विचारधारा, संस्कृती, परंपरा, आचारपद्धती, सामाजिक संकेत इत्यादींचा वापर करावा.'' हे विधान जेव्हा लेखिका करते तेव्हा संदर्भांकित विधानाचा सखोल आशय बदलत्या परिस्थितीनुसार बदलेल. सामाजिक स्वरूप प्रामुख्याने डोळ्यासमोर येते. स्वदेशी विचारधारा जर शिक्षणाच्या माध्यमातून रुजवायची असेल तर सर्वप्रथम शिक्षणविषयक तत्त्वज्ञानात बदल घडवून आणावा लागेल. 'स्वदेशी शिक्षण तत्त्वज्ञान' हा शिक्षणाचा पाया ठेवावा लागेल व ह्या तत्त्वज्ञानाला अनुसरून शिक्षणविषयक ध्येय निर्धारित करावे लागेल.

**स्वदेशी तत्त्वज्ञानाचा आशय**

'भारताचे अंतरंग बघायचे असतील, तर ते सापडेल फक्त भारतीय अध्यात्मात'

असे उद्गार स्वामी विवेकानंद यांनी काढले होते. अध्यात्म हा भारताचा आत्मा आहे.
ह्या अध्यात्माचा गाभा आहे 'स्व'ची अनुभूती. 'स्व'ची अनुभूती हे जीवनाचे इतिकर्तव्यच
आहे. स्वानुभूती म्हणजेच आपल्या स्वत्त्वाचे जागरण. जीवनमूल्ये ही भारतीय
अध्यात्माने प्रदान केलेली देणगी आहे. जीवनमूल्ये शाश्वत आहेत. ह्या जीवनमूल्यांच्या
प्रकाशात विकासाचा मार्ग दृग्गोचर होत असतो. स्वदेशीचे तत्त्वज्ञान हे शाश्वत
जीवनमूल्यांशी निगडित आहे व त्यायोगे आर्थिक व सामाजिक संदर्भात स्वतःच्या
सामर्थ्याच्या जोरावर विकास घडवून आणणे ह्यावर 'स्वदेशी तत्त्वज्ञाना'चा विश्वास
आहे. मानवी जीवनाच्या विविध पैलूंमधून स्वत्त्वाचे प्रगटीकरण होत असते व त्यातूनच
स्वावलंबन व स्वाभिमानाचा उदय होतो. ही बाब देशाच्या संदर्भात लागू पडणारी
आहे. स्वदेशी तत्त्वज्ञान हे शाश्वत व सार्वजनिक मानवतावादी तत्त्वज्ञान आहे. हे
तत्त्वज्ञान विश्वकल्याणाचे तत्त्वज्ञान आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या विकासाचा
मार्ग हा इतर व्यक्तींसारखा नसतो आणि नसावाही. कारण प्रत्येक व्यक्तीची प्रकृती,
मानसिकता भिन्न आहे. तद्वतच प्रत्येक राष्ट्राचा विकासाचा मार्ग हा इतर राष्ट्रासारखा
नसतो आणि तो नसावाही. प्रत्येक राष्ट्राचे स्वतःचे अस्तित्त्व असते. त्याची स्वतःची
प्रवृत्ती, संस्कृती, परंपरा भिन्न असतात. त्यामुळे इतर देशाच्या विकासाचा मार्ग हा त्या
देशाला मानवणारा नसतो. आपला विकास साधताना इतरांच्या अनुभवांचा फायदा
जरूर घ्यावा. इतरांचे सहकार्य जरूर घ्यावे. परंतु अवलंबित्व नसावे. हे परस्पर संबंध
परावलंबन न राहता परस्परावलंबनाचे, परस्पर सहयोगाचे असावे, हीच धारणा स्वदेशी
विचारसरणीत आहे.

**स्वदेशी शिक्षणाची चतुःसूत्री** – स्वराष्ट्र निर्माणाचे आधार (१) स्वातंत्र्य (२)स्वावलंबन
(३) स्वभाषा (४) स्वधर्म



स्वदेशी तत्त्वज्ञान हा देशाचा प्राण आहे. राष्ट्राचा आत्मा आहे. महात्मा गांधी यांचे पुढील विधान ह्या संदर्भात अतिशय मार्मिक आहे. ते म्हणतात, ''स्वदेशी हा तर शाश्वत धर्म आहे. त्याचा व्यवहार प्रत्येक युगात बदलत राहील आणि बदललाही पाहिजे. स्वदेशी हा आत्मा आहे. भारतामध्ये या युगासाठी खादी हे त्याचे शरीर आहे. वेळ येताच या देहाचा नाश झाला तर होऊ दे. नंतर तो दुसरा नवीन देह धारण करेल पण अंतस्थ आत्मा तर तोच असेल. स्वदेशी हा एक सेवाधर्म आहे, हा सेवाधर्म आपण जर नीट समजावून घेतला तर आपले, आपल्या परिवाराचे, आपल्या देशाचे आणि साऱ्या जगाचे कल्याण होईल. स्वदेशीत स्वार्थ नाही, शुद्ध परमार्थ आहे. म्हणून मी त्यास यज्ञ मानतो.'' ('नवजीवन' गुजराती १९-६-१९२७)

वरील स्वदेशी तत्त्वज्ञान चतुःसूत्रीचा आशय हाच आहे. स्वराष्ट्र हे सुराज्य करायचे असेल तर सर्वप्रथम राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा आशय समजावून सांगावा लागेल. स्वातंत्र्याच्या आशयाची अनुभूती झाल्यानंतर स्वत्त्व, स्वअस्तित्व व स्वानुभूती व्यक्तीला येईल व स्वधर्म, स्वभाषा यातून स्वावलंबन व स्वाभिमान जागृत होऊ शकेल.

भारताने आता वरील शिक्षणविषयक ध्येयाचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. सर्व शिक्षणतज्ज्ञांना माझी नम्र विनंती आहे, की शिक्षणाचा आशय बदलत्या संदर्भात त्यांनी पडताळून पाहावा. देश पुन्हा पारतंत्र्यात चालला आहे. आज जर आम्ही सावध झालो नाही, तर ती वेळ आता दूर नाही, की काही काळाने आम्ही गुलामगिरीत असू. ही गुलामगिरी मानसिक असेल, विकृत असेल, भयावह असेल. ह्या गुलामगिरीतून पुन्हा बाहेर निघणे शक्य होणार नाही. कुंपणच शेत खात असेल तर तक्रार कुणाकडे करायची ? शिक्षणक्षेत्रानेच आता सावध व्हायला हवे. वरील तत्त्वाच्या आधारे 'स्वदेशी शिक्षण योजना' राबवायला हवी. नव्हे अनिवार्य करायला हवी. उज्ज्वल भविष्यकाळाची हीच गुरुकिल्ली आहे.